# महायुध्द



म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५६५

REFBK-0025519
REFBK-0025519

वामन निंबाळकर

संदर्भ काव्य
~~२५९३~~ २५६५
२६५१९
१६।१।८८

~~२५९३~~
२६५१९
१६।१।८८

काव्य
२५६५

# महायुद्ध

वामन निंबाळकर

We must beat iron when it is hot,
but we may polish it at leisure
– **Dryden**

# महायुद्ध

(कविता संग्रह)

वामन निंबाळकर

REFBK-0025519
REFBK-0025519

प्रबोधन प्रकाशन, नागपूर - ४४० ००३

प्रबोधन प्रकाशन – १४

महायुद्ध (कविता संग्रह) □ वामन निंबाळकर

Mahayudhya (Poetry) □ Waman Nimbalkar

© सौ. स्नेहलता वामन निंबाळकर

पहिली आवृत्ती □ १ आक्टो. १९८७

किंमत पंचवीस रुपये

पृष्ठे १०४

प्रकाशक □ प्रबोधन प्रकाशन,
१०/२ एम. आय. जी. कॉलनी, मेडिकल चौक, नागपूर–३

मुद्रक □ अभय लवाटे,
मॅजेस्टिक प्रिंटींग प्रेस, टिळक पुतळा, नागपूर – ४४० ००२

मुखपृष्ठ □ भाऊ समर्थ

मांडणी व रेखाटने □ वामन निंबाळकर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर—

तू प्रज्ञापुत्र, करुणेचा सागर आणि शीलाचा हिमालय होतास

कित्येक खंडकाव्ये लिहावी

इतका तू महान होतास
तू पाणी होतास, तू आग होतास

अगणित विद्वान डोक्यात घेऊन मिरविणारा

तू झोपलेल्यांची जाग होतास

**पूर्व प्रकाशन–**

सत्यकथा, समुचित, युगवाणी, अस्मितादर्श, कविता–रती, पूर्वा-काव्यानुभव, दिवाळी अंक – लोकमत, तरूणभारत, शब्दालय, बंद दरवाजा, दा. टाइम्स, श्रमिक विचार, लोकप्रभा इत्यादि.

२४६६५
२५५११
२६।१२।८६

## मनोगत

'गावकुसाबाहेरील कविता' या माझ्या पहिल्या संग्रहाने मराठी काव्यप्रांतात यशस्वी मजल मारून लक्षवेधी ऊंची गाठली. मराठीतील थोर लेखक, समीक्षक, विचारवंत, अभ्यासक, संपादक गं. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर, पु. ल. देशपांडे, वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज), प्रा. नरहर कुरुंदकर, प्रा. गं. बा. सरदार, डॉ. म. ना. वानखडे, प्रा. म. भि. चिटणीस, बाबुराव बागूल, डॉ. भालचंद्र फडके, प्रा. रा. ग. जाधव, प्रा. डॉ. यशवंत मनोहर, प्रा. म. सु. पाटील, प्रा. प्रकाश कामतीकर, प्रा. वसंत आबाजी डहाके, प्रा. केशव मेश्राम, प्रा. गंगाधर पानतावणे, ताराचंद्र खांडेकर; म. य. उपाख्य बाबा दळवी, पु. रा. बेहेरे, प्रा. मधुकर केचे, प्रा. चंद्रकांत पाटील, प्रा. सुखराम हिवराळे, प्रा. गो. म. कुलकर्णी, डॉ. ललिता कुंभोजकर इत्यादी ज्येष्ठ आणि समकालिन मान्यवरांनी समीक्षणात्मक प्रतिक्रीया व्यक्त केल्या. मनापासून दाद दिली. या संग्रहातील काही कवितांचा उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समावेश झाला. काही कवितांची इंग्रजी, हिन्दी, गुजराथी, तेलगू इत्यादी भाषांमध्ये भाषांतरे झाली. त्यातील काही कविता साता समुद्रापलिकडे गेल्या. 'माय' या कवितेने तर लक्षावधी श्रोत्यांना व वाचकांना अन्तर्मूख करून रडविले आणि मराठीतील 'आई' या विषयावर लिहील्या गेंलेले किर्तीमान उच्चांक मोडले. गावकुसाबाहेरील कविता या संग्रहावर जवळपास सत्तेचाळीस परिक्षणे लिहीली गेली. काही मोठ्या वृत्तपत्रांनी अग्रलेख लिहिले व या संग्रहाच्या दोन आवृत्त्या संपल्या.

त्यामुळे जबाबदारी वाढल्याने हा उशीरा येत असलेला दुसरा कवितासंग्रह. त्याचे पहिल्यासारखे मूल्यमापन होईलच.

या संग्रहातील कविता मराठीतील वाङ्मयीन व कवितेला वाहिलेल्या दर्जेदार नियतकालिकातून ह्यापूर्वी प्रकाशित झाल्या आहेत. त्या सर्व संपादकांचे मी आभार मानतो. संग्रह उत्कृष्ट निघावा म्हणून माझे मित्र

डॉ. यशवंत मनोहर, डॉ. रमेश रत्नपारखी यांनी सहकार्य केले. त्यांचा ऋणनिर्देश औपचारिक नाही.

कठीण प्रसंगी जो मदतीस धावून येतो तोच खरा मित्र व पाठीराखा भाऊ. हे नातं जी. डी. गणवीर आणि सौ. विजया गणवीर वहिनी यांनी आपल्या प्रेमळ कृतीनं नव्यानं निर्माण केलं. कु. सुषमा, कु. संगीता, कु. शर्मिला, कु. स्मिता (छोटकी) यांची निर्व्याज माया याच काळात मिळाली. चि. अनिल (खंडागळे) प्रत्येक कामास धावून येतो. सौ. स्नेहची जोड सतत प्रोत्साहित करणारी. आंबेडकरी विचारांनी थांबलेल्या पावलांना गती मिळते. त्यामुळे यापुढेही माझी कविता थांबणार नाही.

ख्यातकिर्त चित्रकार भाऊ समर्थ यांनी मुखपृष्ठासाठी काढलेले अर्थपूर्ण मोहक चित्र व रविन्द्र मेश्राम यांची रेखीव अक्षरे यांनी पुस्तकांचे सौंदर्य वाढले. मॅजेस्टिक प्रिंटिंग प्रेसचे अभय लवाटे, त्यांचे कामगार यांच्या शिस्तबद्ध कामाने पुस्तक नेटके झाले. या सर्वांचा आभारी आहे.

नागपूर

१ आक्टोबर १९८७ — वामन निंबाळकर

# अलिखित कादंबरीचा नायक

पुढे टाकलेल्या प्रत्येक पावलाचे
संदर्भ मागे सोडीत गेलो
म्हणूनच एका अलिखित
परंतु अक्षर कादंबरीचा
नायक झालो

शक्य होते तेवढे
आसवांचे समुद्र आटविले
आतल्या आत
लिहीत गेलो भूतकाळाच्या पाटीवर
विषम आकडे
एक, तीन, पाच, सात

अशा उलटच्या सुलटच्या
वळणांच्या वाटांवर
गतीमान पावलांनाही
लागतात आगी
जरी कुठे हिरवे कंदिल
कुठे थांबा, हळू चला,

पुढे गतीरोधक आहे
असे फलक
असतात जागोजागी

मागे उलटून पाहावे
असे डोळ्यांचे डोळेपण
हिरावून गेले, येथवर आलो
कुठेच लिहीला नाही एकही शब्द
तरी अक्षर कादंबरीचा
नायक झालो

□

मराठी ग्रं संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा स्थळ प्रत

## औषध

मेंदूचे डोळे करून
आणि डोळ्यांचे पाय करून
मी चालू लागलो
मी चाललोय औषधाच्या शोधात
माझी आई आजारी आहे
माझा बाप आजारी आहे
भाऊ, बहीण, सारे नातलग आजारी आहेत
माझा समाज आजारी आहे
माझे राज्य
माझा देश आजारी आहे

मी चाललोय औषधाच्या शोधात
गेलो दवाखान्यात
दवाखाना आजारी असल्याचे समजले
आणि वरा होईस्तोवर
त्याने मेडिकल लिव्ह घेतली असल्याचे कळले

निघालो पुढे
सरळ औषधाच्या दुकानातूनच
औषध घ्यावे असे वाटले

औषधाचे दुकान मेल्याने
त्यांच्या अंत्यविधीची जोरात तयारी चालू होती
बिचारे मेडिकल स्टोअर्स
म्हणून दोन अश्रु गाळले
आणि पुढे निघालो

औषध मिळण्याची खात्री मावळली
तेव्हा परत फिरलो
पाहतो तर
माझे आई, वडील, भाऊ, बहीण,
नातलग, समाज,
राज्य आणि देशाचे निधन झालेले

मी भांबावलो आक्रोशलो
ओक्साबोक्शी रडू लागलो
तेव्हा त्या साऱ्यांची प्रेते
माझ्या मुर्खपणावर हासू लागली
आणि हसत खिदळत
हातात हात घालून
स्मशानाकडे चालू लागली
□

# रस्ते

हे रस्ते माझ्या ओळखीचे
आणि अनोळखी सुद्धा
कधी, कधी ते माझ्याकडे
पाहून तोंड फिरवितात

हे रस्ते !
कधी मार्गदर्शक असतात
तर कधी धोकाही देतात
या रस्त्यांना कापणं तसं कठीणच
हे रस्तेच माणसांना कापतात,
काहींना अर्धमेलं करून
अर्ध्या वाटेवरच सोडून देतात
या रस्त्यांचही एक राजकारण असते
काही समाजकारण करतात
आणि काही तर कारणाशिवाय
चालणाऱ्या पायांना रक्तबंबाळ करतात

या रस्त्यांच्या कडांना उभी
असलेली झाडं थरथरत असतात

त्यांना रस्त्यांची भीती वाटते
की, रस्ते त्यांच्या आधाराने
धावत असतात ?
तसा हा प्रश्नही वेडगळपणाचाच

... रस्ते कधीच मोडत नसतात
झाडं मात्र कधीतरी कोलमडून पडतात

□

# मी हताश झालो नाही

हे उदयास्त उतरविलेत या खाचात, डोळचात
आणि टिपलेत कोऱ्या कागदावर
कविता म्हणून अर्थ देण्यासाठी
भरत आलेल्या जखमा
चिघळण्यात अर्थ नाही
तुम्ही हताश होवू नका
मी हताश झालो नाही

हे रस्ते चालणारे नसतात
आपणास त्यावर चालावे लागेल
माणूस कधी चिखल असतो, दगड असतो
त्याला घडवावे लागेल
तेव्हाच तो स्वत्वाने जागेल
आणि माणुसकीने वागेल
जिभेवर बर्फ ठेवा, अग्नी ठेवा
मिटून घ्या तोंड आणि ओठही
तुम्ही हताश होवू नका
मी हताश झालो नाही

चालताना जो वादळ झेलत चालतो
भूकंपाचे धक्के खातो,
समुद्र लाटा ओलांडून जातो
त्याच्या अंगाखांद्यावर
विजयाचे झेंडे असतात

ह्या मरणाकडे जाणाऱ्या वाटा
तुम्हाला समृद्ध करतील,
संपन्न करतील
म्हणून म्हणतो दोस्तांनो !
आत्ताच कोठे रक्तात पेटविलेल्या
मशाली
तुम्ही का विझवता मला समजत नाही
तुम्ही हताश होवू नका
मी हताश झालो नाही
□

# आता कुठे

आता कुठे ही मुले
बोलू लागली, चालू लागली
दिशा खडबडून जाग्या झाल्या
धरती हालू लागली
आकाशाने श्वास रोखला
समुद्राच्या हृदयाचा ठोका चुकला

अजून तर या मुलांना
येथल्या ऋतूंची ओळख
व्हायची आहे
वादळाचे संगीत
ज्वालामुखीचे गीत
यांच्या कानांनी
ऐकायचे आहे

मग सूर्यकुलातील ही मुले
डोळ्यातील बुबुळांना
सूर्यगोल बांधून घेतील
पायाला प्रकाश वेगाचे

यंत्रयान लावतील
तेव्हा यांच्या जिभेला
येईल पोलादीपण
आणि श्वास होतील
जाई मोगरा निशिगंध
रातराणीचा सुगंध

हातातील लेखणीच्या बंदुकांना
सज्ज ठेवतील काळोखावर डागण्यासाठी
यांचे बलदंड बाहू
पृथ्वीगोल सहज उचलून धरतील
बुडताना वाचविण्यासाठी
□

## वादळ

आकाश भरून आले आहे
वातावरण गंभीर झाले आहे
वादळाची शक्यता नाकारता येत नाही

वादळ येऊ नये असं वाटत असेल
तर झाडांना अधून मधून पानं
हालवावी लागतात
दिशांना हसावं लागतं
आकाशाला रडावं लागतं
कधी, कधी कोरडच्या भुकेल्या वातावरणाला
भरवावं लागतं
आणि
धरतीच्या पोटाच्या आगीला
क्षमवावं लागतं

हे वादळ तसं फार भयंकर असतं
यात झाडे-झुडपे, घरे-दारे आणि
सारे, सारे जमीन दोस्त होतात
राजे, राजवाडे आणि सिंहासने हटून जातात

सागर आटून जातात
दिशा फाटून जातात
माणसांना माणूसपणाचा आकार राहत नाही
तेव्हा वादळाची शक्यता नाकारता येत नाही

जेव्हा माणसांना माणूसपणाचा आकार राहत नाही
तेव्हा वादळाची शक्यता नाकारता येत नाही
हा हवामान खात्याचा अंदाज नाही
की, ज्योतिषाचे भविष्य नाही
म्हणून हमखास चुकण्याची शक्यताही नाही

वादळ येण्याच्या शक्यतेला ओळखण्यासाठी
कवीचे डोळे असावे लागतात
उंची पाहण्यासाठी
गरुडाचे पंख असावे लागतात
खरं बोलण्यासाठी पोलादाची जीभ असावी लागते
परजलेल्या लखलखत्या तलवारीच्या पात्यावर
चालण्याची तयारी असावी लागते
दु:खी, कष्टी वातावरणाला मायेची

फुंकर घालावी लागते
तेव्हाच वादळे ओळखीची होतात
त्यांच्या शक्यताही ओळखीच्या होतात

हे असले वादळ कवेत मावत नाही
की, क्षितीज त्याला गवसणी घालू शकत नाही
त्याच्या आकाराला आकारता येत नाही
वादळाची शक्यता नाकारता येत नाही
□

# दिनचर्या

भल्या पहाटे मला आरडा ओरडा, गोंधळ
ऐकू आला
कावळे घोषणा देत होते
'आजचा सूर्य आम्ही आणला'
मी डोळे चोळून उठलो
बाहेर पाहिले
कावळ्यांनी साहित्यिक मेळावा
भरविला होता
आणि स्टेजवर भाषण ठोकायला
सुरवात केली होती
एक म्हणाला सूर्याकडे चोच करून
'अरे जा ! आम्ही काव काव केली नसती
तर तुझा प्रकाश लोकांना दिसलाच नसता'

सकाळी वृत्तपत्र उचलले
आणि बातम्या वाचू लागलो
उंदराने मांजराला खाल्ले
पहिली ठळक अक्षरातील बातमी

सात लांडगे एका बकरीवर
तुटून पडले
तिला मांस, हाडे, रक्त आणि तिच्या भावनासहित मटकावले
पहिल्या बातमीने मनोरंजन झाले
दुसऱ्या बातमीने
डोळे गरगरायला लागले
माझ्यापुढील वर्तमानपत्र काळेठिक्कर पडले

चष्मा लावून बाहेर पडलो
समोरच्या कोपऱ्यावर
सिद्धार्थ गौतम बुद्ध
गुडघ्यात मान घालून
ओक्साबोक्सी रडत होता
मी त्याला ओळखले
विचारले, 'अरे का रडतोस ?'
माझ्या सहानुभूतीच्या प्रश्नाने
त्याला मोठा हुंदका फुटला
तो म्हणाला,

'मी शोधलेले दु:खाचे कारण
मला सांगशील का !
मी आता ते विसरलो आहे
आता मी दान मागायला गेलो होतो
तर एकाने मला चक्क
पाणी म्हणून दारू पाजली
आणि तो दाता म्हणाला,
'सुरा मेयर मज्ज पमादढ्ठाणा वेरमणी
सिखखा पदं समाधियामी '
सिद्धार्थाची समजूत न काढताच मी तेथून सटकलो

कोपऱ्यावरून पुढे सरकलो
तिकडून हातात भाले, बरच्या, बंदूका, सुऱ्या
घेऊन एक शांती मोर्चा येत होता
दिनदलितांची घरे जाळून
बायांची अब्रु लुटून, काहींचे खून करून
त्याने विजय संपादन केला होता
दलित शिकले सवरले

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

नोकऱ्या करतात हा त्यांचा गुन्हा होता
विजयी शांती मोर्चात
घोषणांचे वादळ उठले होते
'महात्मा गांधी की जय'
'हमसे जो टकरायेगा मिट्टीमे मिल जायेगा'
महात्मा गांधी जिन्दाबाद
नेहरूजी जिन्दाबाद
इंदिरा गांधी की जय
मोरारजी की जय
जिन्दाबाद मुर्दाबाद मुर्दाबाद जिन्दाबाद
जय पराजया घोषणांचे
धुके सर्वत्र पसरले आणि माझ्यापुढील रस्त्यासह
सारे रस्ते त्यात दिसेनासे झाले

दुपारी जेवायला बसलो
गोल ताट चक्राकार
मला घेऊन फिरू लागले
अशोक चक्रासारखे

त्यात कोरड्या कोरभर भाकरीशिवाय
काहीच नव्हते
'महागाईच्या शिडीने आकाशात जा,'
बायको म्हणाली

दिवसभरातील जखमांचे ओझे घेऊन
माझे हात पाय मेंदू पेंगू लागतात
सूर्य मावळतो तसा मी ही विझू विझू
झालेला असतो

अंधारातही सकाळच्या कावळ्यांचा गोंगाट
वृत्तपत्राच्या बातमीतील उंदीर, मांजर,
बकरीवर तुटून पडलेले लांडगे,
कोपऱ्यावर ओक्साबोक्सी रडणारा सिद्धार्थ,
शांती मोर्चा,
अशोक चक्रासारखे गरगरणारे ताट
माझ्या भोवती फेर धरतात
मी गरगरतो, ते गरगरतात
मग पृथ्वीही गरगरते

घसरत घसरत जावून सारेच
काळोखाच्या दरीत
पुन्हा कोसळून थैमानत राहतात
□

# कधी

कधी राहावे बसून कधी जावे कुण्या गावा
वाट चालता चालता काटा पायात रुतावा

कधी हासत राहावे कधी राहावे रडत
आसवांच्या ओझ्याखाली कधी कुढत कुढत

कधी राहावे मौनात कधी बोलत राहावे
डोळे उघडे ठेवून कधी घोरत राहावे

सदा राहावे उपाशी कधी कधी घास घ्यावा
संगे कोरडचा भाकरी आसवांचा घोट प्यावा

कधी विझवून घ्यावे कधी ठेवावे जाळत
कधी ओले चिंब आधी मग ठेवावे वाळत

थोडे घेणे थोडे देणे जर चुक कधी झाली
कधी विझवू हे दिवे कधी पेटवू मशाली

□

## तुम्ही

सर्वकाळ तुमच्या सोबत
चालण्याची
माझी इच्छा होती
पण मुळातच
रस्ता खुडण्याचे काम
तुम्ही केले

बेरजेचे गणित मांडून
आयुष्यात जगण्याची
माझी इच्छा नव्हती
पण बेरीज-बजाबाकी,
गुणाकार-भागाकाराची कोष्टके
मांडून गुंता वाढविण्याचे
काम तुम्ही केले

शत्रूंशी लढत असता
कपडे सांभाळण्याचे काम
तुम्ही केले
जेव्हा मी घायाळ झालो
मागे पळण्याचे काम
तुम्ही केले.

□

# एकटा

मी एकटा निर्जन रस्त्यावर
काटचांनी गुंफलेली
कथांची माळ गळचात घालून
फिरत आहे

ती मागे गेलेली वर्षे
शरीरावरील कपडचांसारखी नसतात
ती तर शरीरावरच्या
जखमांचे व्रण होतात
तोंडाने काही बोलत नसतात
पण शरीरावर चुपचाप पडून असतात
खपली धरून

मी पुन्हा एकटा निर्जन रस्त्यावर
ह्या कथा आयुष्याअगोदर
संपत नाहीत, संपवता येत नाहीत
बाहेर भयंकर काळोख
आपल्या परंपरेसारखा
आणि सोसाटचाचा वाहणारा वारा

जसा परंपरेच्या पायाशी बसून
रडतो आहे

मी पुन्हा पुन्हा एकटा निर्जन रस्त्यावर
बाहेर उंच उंच विशाल झाडे
दुःखासारखी वाढलेली
आणि जिथे कुठे झाडे नसतात
तिथे असते एक दीर्घ, गच्च एकटेपण
या एकटेपणाचे उंच उंच ढीग
जसे ढीग नसून कबरी असतात
आणि आपल्याच आयुष्याची प्रेते त्यात
मरून फसतात
काटयांनी गुंफलेल्या कथांची
माळ गळयात घालून फिरत आहे
मी एकटा या निर्जन रस्त्यावर

□

# प्रवास

आसवांमध्ये कोरडे आयुष्य
कुस्करून खाताना
आतडचांची भाषा समजत गेली
उमजतही गेली
चैत्राच्या उन्हात, फुफाटचात
चालताना
पायांचेच जेव्हा मैल झाले
तेव्हा पुढचा प्रवास
थकून पाय झाले

माणसांच्या या वाळलेल्या
निर्जीव अरण्यात
हिरवे गणगोत नव्हतेच कधी
तेव्हा सावलीचा किंवा
विसाव्याचा प्रश्नच नव्हता

येथे पक्षी गातात, शीळ घालतात,
थंड गारवा घेऊन वारा
संथ निळ्या पाण्यावर

हळुवार खेळत असतो–
हे असले प्रसंग
कल्पनेच्या कादंबरीत असतात.

जीवनाच्या कथांमधे मात्र
चैत्राचे उन्ह असते,
फुफाटा असतो.
चालताना पायांचे मैल होतात
आणि पुढचा प्रवासच
थकलेले पाय होतात
□

# खायचे म्हणजे

झाड खाते फळ
कुंपण खाते शेत
न्यायाला खाण्याचा
अन्यायाचा बेत

खायचे म्हणजे
भिंत खाते पाया
मुळासह ऊस
जात नाही वाया

कुणा कोण खाई
याचा नेम नाही
चाऱ्याला सोडून
दूध पिती गाई

□

# ओंजळभर पाणी

दिवस सोडून जातात
मागे वळून न पाहता
रात्रीही पुरत्या बेईमान असतात
आराम फासावर लटकतोय
अनंत वर्षांचा
झोप केव्हाच बुडून गेली
वादळी समुद्रात

ज्यांच्या पायांवर पाय देवून चालावे
त्या पायांवर आम्ही गु-घाण ओतून ठेवली
मग या गुहेत स्वच्छतेवर
परिसंवादाचे आयोजन
या कार्यक्रमाचे आम्ही आयोजक,
वक्ते आणि श्रोतेसुद्धा
या गुहेच्या बाहेर पडावे तर
प्रत्येक गुहेच्या तोंडाशी
वाघाचा उघडा जबडा
इंगळीसारखे विष ओकणारे डोळे

आणि आसमंत भेदून जाणारी डरकाळी
मागे फिरावे तर नागांचे थयथयाट
आणि फणा काढून फुत्कारणे

आमच्या सर्वांगाला चिकटल्या आहेत
जळवा, रक्ताचे प्राशन त्यांचे न संपणारे
पाया खालील जमिनीला भूकंपाचे हादरे
कोठे काहीही स्वच्छ नाही
काहीही सुरक्षित नाही
म्हणूनच शब्दांच्या ओंजळीभर पाण्याने
तहान भागविण्याचे असफल
तरीही जगण्यासाठी पुरेसे प्रयत्न
□

# नाटक

फाटलेल्या दिवसांच्या कागदांचे चिटोरे
इतस्त: विखुरले ओवती भोवती
कधी काळी घोंगावणारे वादळ
लोळा गोळा होवून
लुत भरलेल्या कुत्र्यासारखे
निपचित पडले पायांभोवती

स्वप्नांची मच्छरं
झोप मोडणारा किळसवाणा आवाज
करीत आहेत कानांभोवती

अशा अवस्थेत
नाटकाचे पडदे उघडून
आम्ही फिरत आहोत
नट सम्राटासारखे
चेहऱ्याला रंग फासून
वेगवेगळ्या भूमिकेत

तिसरी घंटा होण्या अगोदर
आम्ही नाटक सुरू करतो

आणि अंक संपायच्या आत
आम्ही पडदाही टाकतो
तसे नाटकांच्या स्पर्धेत
बक्षिसपात्र आम्हीच ठरतो.

□

# कवितांचे ऊर्जायन

तुमच्यासाठी घेऊन आलो आहे मी
कवितांचे ऊर्जायन त्यातील तुमचेच असेल सारे
असो काहीही येथे
उन्ह, पाऊस, वादळवारे
गाणार मी तुमच्याचसाठी
माझे शब्द तुफानात पेटलेल्या मशाली
त्यातच प्रकाशमान करीन
तुमच्या ख्याली खुशाली
मी घराघरातून लावणार आहे दिवे
सर्वांना हाकारून करणार एकत्र
गळयात गळा घालणारी भेट घालीन
दिवस रात्र
अस्तंगत झालेल्या त्या सूर्याच्या किरणांची
माझ्या लेखणीत आहे साठवण
माणसाशी माणसासारखे वागावे
याचीच करून देणार पुन्हा एकदा आठवण
मी फार पुढे गेलो किंवा मागे राहिलो
तरी तुमच्या येण्याजाण्याची वाट पाहीन
क्षितीजात विलिन होतानाही
तुमचेच गीत गाईन

□

# रक्तकमळ

दफन केलेत श्वास
निःश्वास
हातापायांना खिळे ठोकले म्हणजे
थेंब थेंब गळणाऱ्या
रक्ताचे तळे होते
तसे आजकाल कोणी
तळ्यात कमळे लावीत नसतोच म्हणा
म्हणूनच तळ्याचेच रक्तकमळ
करण्याची ही किमया
त्यांच्या डोक्यातून निघाली
तशी ती पूर्वापार चालत आली
तेव्हाच आमच्या पिढ्या पिढ्यांच्या
अस्तित्वाची, जगण्याची शिकार झाली

त्यांनी इतिहास दडविले
रस्तोरस्ती, क्षणोक्षणी
आमची पाने ठेवली कोरी
आजच्या स्वातंत्र्यात सुद्धा

चोरच करतात शिरजोरी, मुजोरी

आता रक्तकमळांना नसलेला
सुगंध आम्ही घेत बसलो
डोळ्यातील आसवांना मागे लोटून
त्यांच्या खुनी हातात
हात देत हसलो
□

# शहर

मी पाहिला या शहराचा मृत्यू
जन्मण्या अगोदर
पाहिलेत रुग्णाइत रस्ते
कण्हत, कुथत, विव्हळत
इथे, तिथे रस्त्या रस्त्यांवर पडलेले

ह्या झोपडचा ठिकठिकाणी
घोळक्या, घोळक्यांनी
खाली माना घालून बसलेल्या
सडलेल्या, पिडलेल्या, खंगलेल्या
देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांसारख्या
किंवा
बंद गिरणीतील
उदास, चिंताग्रस्त करपलेल्या चेहऱ्यांच्या,
शरीरांच्या
गिरणीबाहेर बसलेल्या कामगारांसारख्या

या शहराच्या डोक्यावर
डबकी, नाल्या, गटारं, ड्रेनेज

पिंजारलेल्या केसांगत
आणि माणसे
निवडुगांच्या निरनिराळ्या आकारात
प्रकारात
स्वत:ला कुंड्यांमध्ये सजवून बसलेली

हे शहर
नुसतेच बेवारस प्रेत नव्हे
सजवलेले मढे
आणि त्याच्या गळ्यातील हार
म्हणजे येथले व्यवहार
ज्यामुळे लाजेलाही
लाज वाटावी
असे

या शहराचा मृत्यू
जन्मण्याआधीच मी पाहिला
मेल्यानंतरही हे शहर
घामाने चिंब भिजलेले

वाहणाऱ्या पाटासारखे
रक्त याचे थिजलेले

मात्र यालाही सिनॅरिटीचा, जातीचा
परंपरेचा अभिमान आहे
माणसासारखा
यानेही माणसाप्रमाणेच
माणसांच्या हजारो पिढ्या
खाऊन पचवून टाकल्या
आणि ढेकर देऊन
पोटावरून हात फिरवित
तीच परंपरागत पूजाअर्चा करू लागले
असे हे शहर अर्थहीन

न जन्मताच
अर्थाशिवाय मरणारे
□

## बघ

बघ ! कसे चढले जातात
अहंकाराचे मजले
वर्तमानपत्राच्या साक्षीने
काळोखाने कुस्ती जिंकली
प्रकाशाला खोडा टाकून

विश्व बगलेत घेऊन मिरविणारा
माणूस नावाचा प्राणी बघ,
कसा वाकला आहे
देव नावाच्या दगडासमोर

हे वळणा वळणावरचे प्रदेश बघ
कसे निवडुंगांच्या काटयांनी
भरून गेले गच्च

या दिशांना काय झाले
का पळू लागल्या सैरावैरा
खाली माना घालून
यांना आग तर लागली नाही ना
या आगींना विझविणारी

अग्निशामक दले उभी राहायची
आहेत अजून
आणि माझे झाड
प्रश्नांनी वाकलेले आहे

□

# इन्किलाबचा सभासद

हा आमचा इन्किलाबचा सन्माननीय सदस्य
जीवंतपणीच मेला
खांद्यावर शबनम अडकवून
तसे त्याचे प्रेत
रोज भटकते रस्तोरस्ती,
कार्यालयातून, मंत्रालयातून
पाच, दहा पोरांटोरांच्या
जाहीर सभांतून

आता या जीवंतपणी मेलेल्या
इन्किलाबच्या सभासदाला
आपण श्रद्धांजलि वाहू

अगोदर शवाची वाजत गाजत
मिरवणूक काढू
मग त्याला अग्नी देण्यापूर्वी
एकदा दारूने आंघोळही घालू

हा मरणारा इन्किलाबचा
सन्माननीय सदस्य होता

तेव्हा त्याच्या मेलेल्या जीवाला
अत्तराचा सुगंध नको
त्याने थोडावेळ का होईना
घामाच्या धारांनी अंग
सुगंधीत केलं होतं
त्याला हार नको, तुरे नको
कुणी त्याच्यासाठी रडू नये
दुःखाचा आवाज काढू नये

हवे तर त्याच्या खिशातील
एक पैसा त्याच्यावर ओवाळून
लक्षाधीश, कोटचाधीशाला देवू
तेवढीच त्यालाही
मदत होईल

हा इन्किलाबचा मेंबर
दाढी वाढवून याने
वनांचे रक्षण करण्याचा
आपल्या देशातील नेत्यांचा संदेश

तंतोतंत पाळला होता

हा सुरवातीला दिसायचा कधी
मोर्चात, कधी लाठ्या खाताना
तर कधी ढोरासारखे
पोलिसांकडून ओढत नेताना
आता मात्र दिसते त्याचे प्रेत
अर्धा कप चहा
कोपऱ्याच्या हॉटेलवर पिताना
असे घडले
जे घडू नये सर्वसाधारणपणे
असा म्हणण्याचा प्रघात
त्याला दफन करण्यापूर्वी
किंवा जाळण्यापूर्वी उरकून घेऊ
एक इरसाल श्रद्धांजलिची सभा
म्हणजे तेवढेच त्याला
जीवंत राहायचे ओझे वाटणार नाही
□

# मोर्चा

अरे ! हा मोर्चा तर
दिवे गेलेल्या रस्त्याने
जात आहे
मोर्चेकऱ्यांच्या पायांना
दिसत नसावे

आणि मोर्चातील घोषणा
मुक्या बहिऱ्या
झाल्या आहेत
मोर्चेकऱ्यांचे गळे आणि कान
गहाण असावे

□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## माझा गाव

माझ्या गावाने
माझ्या पायात काटे दिले
आणि सोबत
वादळाची पायवाट दिली

त्या गावाचे माळरान ओलांडताना
मनाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या घेऊन
पायांचे ठसे उमटवीत दिशादिशांवर
मी पालं ठोकली
आणि
पिढ्यापिढ्यांच्या जखमा
शिवत बसलो

माझ्या गावाने
माझ्या पूर्वजांच्या पिढ्यांचे
भविष्य घेऊन
बदल्यात ओटीत शिळे तुकडे देऊन
त्यांना उध्वस्त जगाचे सम्राट केले
त्या सम्राटांच्या वंशातला

मी एक राजपुत्र

मी राजपुत्र
जेव्हा कधीमधी गावात जातो
तेव्हा गावातील गावकऱ्यांच्या
तिऱ्हाईत नजरा
माझ्या शरीराचे, मनाचे लचके
तोडण्याच्या जय्यत तयारीने
स्वागतास उभ्या असतात
रांगा लावून
उपहास, तिरस्कार आणि
टिंगलींनी
उभारलेल्या, सजवलेल्या
हास्यांच्या कमानीतून
मी जात असतो
टोमण्यांच्या फुलांचे हार स्वीकारीत
तेव्हा
आया बहिणीच्या लुटलेल्या अब्रूच्या

आणि
बापाभावांच्या तोडलेल्या हातापायांच्या वेळी
आक्रोशून काढलेल्या
आर्त किंकाळचांच्या संगीताचे सूर
दूरवर ऐकू येतात

मी प्रवेशतो माझ्या राजवाडचात
जमीनदोस्त झालेल्या
माझ्या घरांची खिडारं
हातांच्या ओंजळीत घेऊन
डोळचातील पाण्याने शिंपू लागतो
घायाळ मनाच्या कुंडीत
पुन्हा भेटीचे फूलझाड लावतो
आणि दूर जाताना
मागे वळून पाहतो

आता दूरून दिसणाऱ्या
गावाचे लुकलुकणारे दिवे
मला आगीचे डोंब वाटतात

डंखलेल्या काटचांच्या त्या,
मनातील सलसलणाऱ्या, जागा
माझ्या परतलेल्या पावलांच्या
सोबती असतात

□

# सावित्री ज्योतिबा फुले

घनघोर तमाचा उत्पात
करावयास निघालेल्या ज्योतिचा
तू हातात हात घेतलास
तुला ठाऊक होते
तू सूर्याला कवटाळले आहेस
सूर्य संगतीने तू भस्मसात झाली नाहीस
सावित्री
तर तू प्रकाशाचे आयुष्य
ऊधळीत गेलीस

या समाज व्यवस्थेच्या अरण्यातील वादळात
'ज्योती'ला पदराखाली तूच घेतलेस
आणि तिने दिलेला संदेश
घेऊन निघालीस
येथील कोटयावधी स्त्रियांना
अज्ञानाच्या जेलाचे
दरवाजे तोडण्यास सांगायला
मनुच्या अवलादीने

स्त्रियांना हजारो वर्षे
चुलीतील लाकडांसारखे जाळत ठेवले
त्याच राखेतून
तू अंगार फुलविला
दिले घराघरातून शिक्षणाच्या झऱ्याचे पाणी
या वाळवंटी प्रदेशात

तू चिरडलीस मनुस्मृती
तुझ्या पायतानाखाली
त्यावेळी तू चालत होतीस सावित्री
दाहिदिशांची माता होवून
अखिल स्त्री मुक्तीची गाथा होवून

तुझ्यावर वाटांवर
वखवखलेल्या माणसांची श्वापदे
पाळत ठेवित
तेव्हा त्यांना वठणीवर आणायला
तू पोलादाचे काळीज
हृदयात ठेवले होते

उफाळणाऱ्या सागर लाटांवर
तू स्वार झाली होतीस
तू वीज झाली होतीस
सावित्री ! तू वीज झाली होतीस

□

# आकाश फाटले

कसा कुठे टाका घालू
सारे आकाश फाटले
तिथे बारमाही वर्षा
इथे सागर आटले

आग पाण्याने लागली
झाले गावाचे स्मशान
आसवांचे कुंभ रिते
भागे उन्हाने तहान

प्रकाशाचे लाख डोळे
गेले अंधारी बुडून
सारी फुले कुस्करली
नेल्या कळ्याही खुडून

तेव्हा गाव सोडताना
उरी दुःखाचे डोंगर
पापणीच्या काठावर
उभे मुके यांचे घर

□



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

बाबासाहेब !
या तहानलेल्या उपेक्षितांच्या वरून
वीस शतकांचे अध्याय
फडफडत, उडत गेले कोरे करकरीत
त्यांना कुणीही वाचले नाही
की चाळलेही नाही कधी
तू मात्र त्यांना सखोल वाचले,
पानोपानी अक्षर अन् अक्षर
तू वाचले, मनन, चिंतन केले

तू एक महान कुशल
कलात्मक हुरहुन्नरी संपादक
ज्याने येथील माणूस संपादित केला
मती नसलेल्यांना नीति देऊन
गतीमान केले
मेंदूत सद्‌विचारांचे
अशोक चक्र बसविले
आणि साभार परत केली

देव, धर्म, रूढी, परंपरा, जात व दास्य
जतन करणारी मनुस्मृती
दाखविली माणसाच्या मेंदूची किमया
तोवर मेंदूचा वापर
क्वचितच होत होता

जेथे अन्याय, अत्याचार, दास्य
आणि विषमतेची पूजा होवू लागते
अन्यायाला न्यायाची प्रतिष्ठा येते
काळोखाच्या साम्राज्यात
घुबडांना गरूडाचे महत्व प्राप्त होते
तेथे 'बाबासाहेब' महापुरुष
जन्मास येतो
अंधार उजळून निघतो
कातळाला डोळे फुटतात,
पाय फुटतात
साऱ्या शोषणाच्या पायवाटा
अस्पष्ट, नष्ट होत जातात

मग निर्माण होतो न्याय, नीतिचा
जीवन मार्ग
त्यावर आणि युगायुगावर
कोरल्या जातात
'बाबासाहेबाच्या' पाऊलखुणा

बाबासाहेब आंबेडकर
विसाव्या शतकाच्या शिल्पकाराचे नाव
आंबेडकर
गुलामीचे जोखड फेकून
स्वाभिमान देणारे आडनाव

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या देशाचा नकाशा सविस्तर
सुरक्षित, अखंड ठेवणारा देशभक्त
राष्ट्रपुरुष, महापुरुष
अगणित मनगटांची ताकद एका शब्दात बांधणारा
एकमेव अद्वितीय नेता

बाबासाहेब, हे महापुरुषा !
मी फक्त तुलाच महापुरुष म्हणतो कारण

येथल्या मुक्यांच्या तोंडी तूं
क्रांतीगीतांचे धुंद स्वर दिले
त्यांना मुखर केले
त्यांच्या अंधार वाटांवर सूर्याचे रोपण केले
तू असा कलावंत होता की
दगडात अप्रतिम शिल्पे कोरून
त्यांचे जीवन सुखर केले
त्यांच्या हातात प्रकाश खजिन्यांच्या चाव्या दिल्या
अस्तित्वहीनांना विश्वव्यापी बलदंड आकार दिला
उघड्या नागड्यांना महावस्त्रे दिली
येथील दलितांना दैन्य, दास्य, दारिद्र्य, लाचारी
गुलामीशी लढण्याची तालीम दिली

तू असा सरसेनापती होता की
साऱ्याच आघाड्यांवर मोर्चे बांधले
तुझ्या वाणी, लेखणी आणि करणीच्या तोफगोळ्यांनी
शत्रूंचे सारेच किल्ले जमीनदोस्त केले
हजारो वर्षे पराजित झालेल्यांना तू

साऱ्याच आघाड्यांवर दिग्विजयी केले
शेवटी तुझे आयुष्यच महायुद्ध झाले

या देशाचेही सुंदर चित्र तुझ्या दालनात होते
त्यावर तू कलाकुसर केली
उडालेल्या रंगांना नवी टवटवी दिली
जें ओरबाडले, खरचटले, पडले, रक्तबंबाळ झाले
आणि गाडले होते
त्यांच्या जखमा तुझ्या चैतन्यदायी स्पर्शाने
पूर्णपणे बऱ्या झाल्या
ते उठून उभे झाले
येथील कणाकणाला आणि क्षणाक्षणाला तू जागे केले
हा काही जादूचा चमत्कार नव्हता
तुझ्या दिवसरात्रीच्या कष्टाचे परिश्रमाचे फळ होते
म्हणूनच तू डॉक्टरांचाही डॉक्टर झालास
साऱ्यांचाच आणि कोट्यावधी बापांचाही
बाबासाहेब झालास

हे महापुरुषा ! स्वतःच्या चैनीखातर

एक क्षणही दवडला नाही
मानवाच्या हितासाठी मात्र तू आयुष्य वेचले
जेथे आयुष्याने आरामासाठी पलंगावर पहुडावे
त्यावेळी हजारो वर्षांचे उंच अन् कठीण झालेले
जातीयतेचे शिखर उलथून पाडण्यासाठी
तू सुरूंग पेरीत होतास

या युगाचा प्रथम प्रकाश पाहणाऱ्या
हे महापुरुषा !
खालच्या थरातून आलेल्या तुझ्या
व्यापक नेतृत्वाच्या भरारीपुढे
येथल्या दिशाही थिटचा पडल्या
तू प्रज्ञापुत्र, करूणेचा सागर आणि शीलाचा हिमालय होतास
कित्येक खंडकाव्ये लिहावी
इतका तू महान होतास
तू पाणी होतास, तू आग होतास
अगणित विद्वान डोक्यात घेऊन मिरविणारा
तू झोपलेल्यांची जाग होतास

□

# नेल्सन मन्डेला

नेल्सन मन्डेला !
त्यांनी तुला
कैदबंद केले तेव्हाच तुझ्या
पारतंत्र्याचे साखळदंड निखळून पडले
खळखळा
बंदीवासाच्या अजस्त्र भिंतीतून
तुझ्या कवितेतून निघालेली
स्वातंत्र्याची किरणे
आरपार जावू लागली
त्याने हजारो गुलाम प्रकाशमान झाले
विनीला योद्धा केले, कप्तान केले

नेल्सन मन्डेला
स्वातंत्र्याचा पूजक
आणि वर्णवाद्यांचा
कर्दनकाळ
आकाशाला गवसणी घालणारा
गरुड

ती गिधाडे तुला बंदिस्त
करणार कशी
मन्डेला
काळचाकुट्ट अंधारात चकाकणारा
देदीप्यमान तारा
वर्णवाद्यांच्या विषवल्लींना
मुळापासून उपटून टाकायला
निघालेला वादळवारा
नेल्सन मन्डेला !

तुला कैद करणाऱ्या
गोऱ्या वर्णाचा फाजील अभिमान
बाळगणाऱ्यांना
हे कळायला हवे होते, की
तुला प्रदीर्घकाळ कैदेत डांबून
जेलच्या भिंती खिळखिळ्या होतील
त्यात पांढरे उंदीर, घुशी मरतील
आणि बंदिवासातील

प्रत्येक दिवसाचा क्षण अन् क्षण
तुझ्या स्वातंत्र्ययुद्धावर
विजयाच्या सुवर्णमुद्रा
अंकित करतील

नेल्सन मन्डेला !
तुझ्या माझ्या कवितेने
काळ्याकुट्ट कोठड्यांचे
अंधारयुग साहिले आहे
आणि आता
हे सुर्ययुग पाहिले आहे
□

# बंड-विद्रोह

बंड-विद्रोह
रक्तात भिजून वाळून गेलेला शब्द
माझ्या विचारांच्या मुंग्यांनी
गर्दी करून
वारूळ बांधत ठेवले या शब्दाभोवती
इथे बंड झाले; नाही असे नाही
अठराशे सत्तावन्नचे बंड-विद्रोह
एकोणीसशे बेचाळीसचे बंड-विद्रोह-सत्याग्रह
चले जावचा विद्रोह
इथे चले आवचा विद्रोह
कधी झाला नाही
इथे भारत छोडो झाला
भारत जोडो झाला नाही
किंवा झाला असेलही
धुळीत पावले उमटावीत म्हणून

बंड-विद्रोह
या शब्दातील अनेक रंग

इथे रक्तात भिजून येतात
म्हणून वाटते
हा शब्द तर केव्हाच
मेला आहे

□

# बंद करा

हा तुमचा आरडा ओरडा
आणि घोषणा देणे बंद करा
हे तुमचे रडणे, कण्हणे, कुथणे
आणि आक्रंदणे बंद करा
बंद करा तुमचे घंटानाद
ढोल, ताशे, बँड बाजे
उघडून ह्या तुम्ही बसला आहात
त्या घरांच्या खिडक्या, दरवाजे

वाजणाऱ्या प्रत्येक तोंडाच्या, वाद्याच्या
आवाजाने भोवंडून टाकल्या
माणसाच्या वाटा आणि चाली
प्रत्येकच माणूस करू लागला
आपल्या घराची आणि जातीची रखवाली

अशा माणसाने आपल्या डोक्याच्या
आणि डोळ्यांच्या मर्यादेत
देशाला आकार दिला
आपल्याच डोळ्याचा आणि चष्म्याचा

देशाला रंग दिला
मग तो त्याच्या मूठभर देशात
आणि गिचमीड रंगात राहू लागला
तो आपलेच गाणे, रडगाणे गावू लागला

आता बंद करा
हे देव, धर्म, मंदिरे सारी
त्यामुळे माणसाच्या डोक्यात
फिरू लागलय गिधाडे घारी
मांस, रक्ताची त्याला लागली चटक
माणूसच माणसाचा झाला शिकारी
□

# पाहिजेत

पाहिजेत, पाहिजेत, पाहिजेत
पाहिजेच्या जाहिरातीचे प्रचंड फलक
मी डकवणार आहे
या देशाच्या नकाशावर
पाहिजे आहेत येथले
जाती जातीचे हवाबंद
युगायुगाचे प्रचंड बुरुज
ढासळणारे, पाडणारे कारागीर

जुने मोडून टाकून
माणसाचे नवीन शिल्प खोदणारे शिल्पकार

ह्या रंगहीन देशाला
सर्वांग सुंदर रंगविणारे रंगारी
तुमच्या तरुणाइत हे कारागीर,
शिल्पकार, रंगारी
मी शोधतो आहे
मला हवी आहे तुमची उमेदवारी

पाहिजेत, पाहिजेत, पाहिजेत

पाहिजेतच्या जाहिरातीचे प्रचंड फलक
मी डकवणार आहे या देशाच्या नकाशावर
पाहिजे आहेत मला
नुसती माणसे, माणुसकीने जमणारी
आणि माणसांसारखी वागणारी

□

# पृथ्वीचे मोजमाप

सळसळणाऱ्या माझ्या रक्ताच्या
प्रत्येक थेंबावर
शब्दांचे पहारेकरी उभे आहेत
डोळे उघडे ठेवून
ईश्वरशाहीच्या गजराने
छिन्नविछिन्न झालेले माणसांचे मेंदू
लोंबकळत आहेत मंदिराच्या गाभाऱ्यात
या वाळलेल्या वृक्षांना
मी पाणी कसे घालू

या आटलेल्या—तहानलेल्या समुद्राला
मी पाणी कसे पाजू
जमिनीवर उतरत असलेल्या आकाशाला
मी टेकू कसा लावू
आता कुठे एकेका पावलाने
मी पृथ्वीचे मोजमाप चालू केले

हे सारे फेडून बसले
अंगावरची वस्त्रे

आणि सोडून लाजलज्जा
यांनी आपल्या कुकर्मांना
सोयीने पवित्र म्हटले
आपल्याच सोयीने
वाल्याला वाल्मिकी केले
आणि रामायण लिहून घेतले

□

# मतलबी आश्वासनं

नदीचे खळाळणारे पाणी पिवून
काळचा जमिनीत पीक घेऊन
वाळवंट आमच्याकडे सरकविले
छत्र्या स्वतःच्या डोक्यावर घेऊन
आभाळाला छिद्र पाडले
सूर्य चोरायचा
तुमचा सफल प्रयत्न
आणि
मतलबी फितूर आश्वासनं
फुकटात आयुष्ये खिशात घालून
गालिच्यावर तुम्ही चालताहात
ऐटीत शिरजोरासारखे
आम्ही मात्र पिढ्यान पिढ्या
खर्चून चोरासारखे

□

## लोकशाही

अविभाज्य भाग आमच्या जगण्याचा
एक अलंकार आमच्या
आयुष्याला प्राप्त झालेला
माणसाचे मूल्य पैशांनी नव्हे
नीतीने ठरते
याचा मापदंड
कुणी कुणाला किती लहान करावे
कोणी स्वतः किती लहान व्हावे
कुणी कुणाला किती मोठे करावे
कोणी स्वतः किती मोठे व्हावे
याची चौकट
लोकशाही ! मेंदूच्या बळाचा वापर
आणि शारीरिक बळाचे खच्चीकरण
लोकशाही ! अशक्तांना घातलेले
महाभयंकर टणक जाकिट
आणि सशक्तांच्या हातून
काढून घेतलेला आसूड
□

# ही वस्ती

या वस्तीत कधी काळी
माणसं राहायची
आता कुत्र्या डुकरांना
या वस्तीने अभयदान दिले
घुशी, उंदीरांनी भिंती, कुडांच्या
आधाराने घरं केली
संसार उभे केले

या वस्तीत कधीकाळी
चिवचिवत राहायची, भिरभिरायची
चिमणी पाखरांसारखी मुली मुलं
झोपडी समोरच्या ओटयाच्या बाजूला
न्हाणीजवळ कन्हेराची झाडं
डवरली असायची, कधी झेंडूची फूलं
आता चिमणी पाखरे
उडाली
कण्हेर, झेंडू वाळून गेली
ही वस्ती

एका दीर्घ कुसंस्कृतीची
साक्षीदार
ही वस्ती
काळ्या इतिहासाचा
दस्तावेज
ही वस्ती
आमच्या मनातील महारोगाची
सूज

□

# तसे जगता येणार नाही

कुऱ्हाडीने डोके फोडून
मेंदू स्वच्छ धुवून घेतल्याशिवाय
पोटातील विष साफ होणार नाही
जातीजातीची निबिड जंगले
उध्वस्त केल्याशिवाय
रानटी, क्रूर श्वापदांना
शोधता येणार नाही
किंवा
भरघोस पीक काढता येणार नाही

जगण्याच्या सर्वांगाला
या वातावरणातील प्रदूषणाने ग्रासले
म्हणून नाकाला, कानाला
किंवा कोणत्याही अवयवाला फेकून
जगताही येणार नाही . . .

□



# माणसे

उदास ओसाड झालेली ही माणसे
खडकाळ माळरानासारखी
किंवा रखरखरत्या वाळवंटासारखी
हिरवेपणा आणि ओलसरपणा
हरवलेली
जगण्याच्या प्रयत्नात

ज्वाळाचे लोळ पोटात घेऊन
राख राख होतात
तसा काळही त्यांच्यावर
हत्यारासारखा तुटून पडतो
बेईमान झालेल्या आकाशाने
सावली काढून घेतलेली असते
त्यांच्या डोक्यावरून
त्यांची अवस्था किनारे नसलेल्या
नदीसारखी होते
पाणी आटून गेल्यावर
नुसती वाळूच वाळू

नदीत राहावी अशी
आणि रात्रीच्या सोबतीला
कोरड्या निरव शांततेत
टोल मारणारा वॉचमन
नसावा अशी
अशी विराण भयाण झालेली माणसे
जाळ्यात तडफडताहेत मासळ्यांसारखी
त्या कोरड्या जमिनीवर किंवा
रखरखत्या वाळूवर आपोआप थंड होतात
□

# मृत्युपत्र

माझ्या मित्रांनो !
असे जवळ या
या गर्द काळोख्या रात्रीचा प्रहर टळून जाईल
मी माझे मृत्युपत्र लिहतोय्
मला मुक्त करा, मला मुक्त करा
अरे अंधाऱ्या वाड्याच्या राखणदारांनो !
मला मशाल विझवून माधारी फिर
म्हणून सांगू नका
माझ्या हातातील या प्रज्वलित आगीला
माझ्यापासून हिसकावून घेऊ नका
या पहा माझ्या मित्रांनो !
मी माझे मृत्युपत्र लिहतोय्

कित्येक अंधाऱ्या कोठड्याचे, तळघराचे
कुलपे, दरवाजे तोडून मी आलो आहे
त्या दैदिप्यमान सूर्याच्या किरणांची ऊब
प्रकाशाची वस्त्रे मी घालणार आहे
मला येथल्या परंपरेची घृणा आहे

याने मला लहानाहून लहान केलं,
माणसातून ऊठवलं,
मला माहित आहे
तुमच्या या ज्ञानाच्या, परंपरेच्या शेवटच्या
किनाऱ्यावर, माणसांची आणि माणुसकीची
नग्न प्रेते उलटी टांगली आहेत

हे ! माझ्या प्रकाशमान मित्रांनो !
या असे जवळ या
तुमच्या माझ्या प्रकाशाने
या अंधाऱ्या कोठड्या उजळून टाकू
माणसांना माणूसकीच्या क्षितीजावर
नेणारे, रथ हाकू

□

## पराभूत दिवस, मेलेल्या रात्री

ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ....... ....
(स्थळ प्रत)

वर्तमानातील खाली माना घालून
पराभूत चेहऱ्याने जाणारे दिवस
आणि मेलेल्या रात्री
पाहिल्या की
भूतकाळात कधी काळी
प्रकाशाचा एक महापूर
या गावात येवून गेला
त्यावेळी लोकांनी
उजेडाच्या प्रार्थना म्हटल्या
आणि दीपोत्सव साजरे केले
यावर विश्वास बसत नाही
कारण
आता तर
प्रत्येक दाराचा आणि घराचा
गल्लीचा आणि बोळाचा
पत्ता प्रकाश किरणाला
सांगावा लागतो

तोही काळोखात
रस्ता विसरून जातो
तेव्हा रात्र मरून पडते
आणि दिवस पराभूत होतो

□

# युद्धभूमी

कळत नकळत ओढल्या जातात
माझे पाय
त्यांच्या या सहेतुक कैदखान्यात
हे आता माझ्यासाठी
युद्ध आणि महायुद्धाचे रणांगण

ही अवर्षणे ओलांडून
मी विद्रोही दिशेने जाणार आहे
कोणत्याही पातळीवर जाण्याची
माझी तयारी
नपुसक आणि नकटच्या शांततेचे
नाही गाणार मी अभद्र गाणे
मी नाही विझू देणार
माझे पेटलेले रक्त
ही दरोडेखोरांची जंगले
आणि
हे भुतांचे मोहमयी बाजार
आळीपाळीने देवमंदिरे, धर्माचा

आसरा घेणारे
त्यावर बुलडोझर फिरवून घ्यावे
कुंपणाच्या बदल्यात तुमच्या घरावर
फुलांनी पहारे करावे
तुम्ही देव-देव्हारे फेकून
घराला स्वच्छ करावे

□

## टांग्याचे घोडे

समुद्राच्या हळूवार गळणाऱ्या आसवांच्या थेंबांनी
माझ्या अंगणात कवितांची रोपटी
उगवतात
चंद्राला भरती येते
समुद्राच्या ऊशाशी बसून
आतले वादळ मात्र कधीच
घोंगावत नाही

रोजचा सूर्य बुडताना
कधी हसतो कधी रडतो
त्याला अंधाराची सोबत मात्र
कायम असते

हे टांग्याचे घोडे
फतकल मारून
खुशाल धोरतात मंत्र्यांच्या खुर्चीत
याच्या पाठीवर कोरडे ओढणारा
चाबूक
यांनी पोटात लपविला असतो

□

# ओळख

नवीन नाही माझ्यासाठी
माणूस गांडूळ किंवा दगड झालेला
नवीन आलेला मोहोर करपून गेलेला

नवीन नाही माझ्यासाठी
आकाश गुडघ्यात वाकलेले
डोंगराचे तोंड हाताने झाकलेले

नवीन नाही माझ्यासाठी
गाईने चोरलेला पान्हा
दुधासाठी सुकलेला तान्हा

नवीन नाही माझ्यासाठी
ऋतुने वांझपण पाहिले
अंधाराचे ओझे उजडाने वाहिले

□

# उधारी

पाण्याने रात्र काढली
हवेवर महिने तगलो
किस्तीने दिवस घेतले
उधारीवर जीवन जगलो

□



# पत्ता

आंधळ्या दिशांना विचारले
क्षितिजाचा पत्ता कोठे
लंगड्या जमिनीवर उभे
दऱ्याखोऱ्या पर्वत मोठे

□

## जखमा

आजकाल आसवांच्या
गेलो ओझ्याने वाकून
साऱ्या जखमा म्हणून
चाले उघड्या टाकून

□

## मोल

दाणे भरडल्या जाती
जाते फिरे गोल गोल
तळ हाताच्या फोडांना
काय जखमांचे मोल

□

# वणवे

रोज पाहता मरणे
गेली आटून आसवे
पेटलेल्या वणव्यांना
ऊरी झेलायला हवे

□

## भाव

झाला प्रकाश बंदिस्त
सारे तम पसरले
माणसांचे बाजारात
पार भाव घसरले

□

# युती

विळचा भोपळचाची जोडी
एका गाडीत बसली
दिली टाळी एकमेका
चाके गालात हसली

□

# विसाव्या शतकाच्या शेवटच्या टोकावर

विसाव्या शतकाच्या शेवटच्या टोकावर
मी आज उभा आहे
भोवती सारेच कसे पेटलेले
गर्जत असलेला उफाळणारा सागर
मी मात्र अविचल, निर्भय
हजारो वर्षांचा प्रवास करून
आज येथवर आलोय्

रस्त्यात लागणाऱ्या खाचखळग्यांना,
काट्यागोट्यांना, मी आलिंगन दिले
तेव्हा ते माझ्या परिचयाचे झाले
नव्हे माझे मित्रत्वच त्यांनी पत्करले
कारण त्यांनाही माझ्यासारखा
जीवलग मित्र भेटलाच नव्हता
मध्ये डोंगर लागला

तेव्हा चढण चढताना
मी थकलो नाही
डोंगरच बिचारा हैराण झाला

दरीत कोसळताना
माझे पाय लटपटले नाहीत
दरी मात्र कोसळत राहिली

मला थंडी वाऱ्याचे कापरे भरत नाही
माझ्या नावाने वादळ मात्र थरथरते
वावटळीत गरगरणाऱ्या
वाळलेल्या पानासारखे

असा मी
विसाव्या शतकाच्या शेवटच्या टोकावर
उभा आहे
भोवती पेटलेले आहे
सागरही उसळत आहे
आणि मी पाहतो आहे येथून
माणसे माणसांची हाडे चघळणारी
एक दुसऱ्याचे रक्त पिणारी
चिरगुट नसलेल्यांना नग्न करणारी
सावली नसलेल्यांना उन्हा पावसात फरफटणारी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५६५
२५६५
मूल्य २५५१५
१६।१।८६

अशी माणसे मात्र धूर्त, कावेबाज असतात
ती नेहमीच कोषात बसतात
तोंड द्यावयास कधीच तयार नसतात
अशा माणसांचे शरीर असणाऱ्या
जनावरांना मी पाहतो आहे

विसाव्या शतकाच्या शेवटच्या टोकावर उभा राहून
एका हातात सूर्य, दुसऱ्या हातात चंद्र घेऊन
मला माझ्या संकल्पाचे भान आहे
एकलव्याच्या तुटलेल्या बोटातील
रक्ताचे मोल आहे
तेच माझे इमान आहे
मी माझा शब्द गहाण टाकणार नाही
मोडेन पण कधी वाकणार नाही
तुम्ही माझ्या पावलावर पाऊल टाका
दिसणार नाही तेव्हा मला मारा हाका
आभाळ डोळ्यात साठवून
मी नजर पुढे केली

REFBK-0025519
REFBK-0025519

तशीच ती थेट तथागताजवळ नेली
आता मी उभारीन क्षितिजावर
मानवतेची इंद्रधनुषी कमान
मला माझ्या संकल्पाचे आहे भान
एकलव्याच्या तुटलेल्या बोटातील
रक्ताचे मोल आहे
तेच माझे इमान
मी माझा शब्द टाकणार नाही गहाण
मी माझा शब्द टाकणार नाही गहाण

□

वामन निंबाळकर या कवीचे नाव आता मराठी कवितेच्या जाणत्या वाचकासाठी एक सन्माननीय नाव झाले आहे. आंबेडकरी विद्रोही कवितेतील जे काही निवडक कवी मराठी कवितेत स्थिरपद झालेत त्यातील वामन निंबाळकर हे एक आघाडीचे विशेषनाम आहे.

'गावकुसाबाहेरील कविता' नंतर त्यांचा 'महायुद्ध' हा कवितासंग्रह प्रकाशित होतो आहे. यामधल्या काळात मराठी कवितेत आणि पर्यायाने दलित कवितेतही सूक्ष्म पातळीवरून काही स्थित्यंतरे घडून आलीत. निंबाळकरांची कविता या स्थित्यंतराकडे डोळसपणे बघत होती आणि हे बघणे जाणिवपूर्वक चालले असतानाच आपले वेगळेपण कायम ठेवण्याचा प्रयत्न करीत होते.

दलित कवितेत अध्यात्माशी छुपे संबंध ठेवणारी आणि संभोग श्रृंगाराचे धिटाईने आणि चवीने वर्णन करणारी एक धारा आहे. दलित कवितेतील ही काव्यधारा आध्यात्मिक आणि लैंगिक बंडखोरीने नावाजली जात असली तरी आंबेडकरी विद्रोही कवितेशी या धारेने बाजाराचे तर्कशास्त्र नजरेसमोर ठेवून फारकत घेतली आहे. दलित कवितेतील दुसरी धारा निव्वळ आंबेडकरी विद्रोहाची आहे. तिचा अभिव्यक्ती विलक्षणतेशी, आध्यात्मिकतेशी व लैंगिकतेशी संबंध नसला तरी आंबेडकरी क्रांती दर्शनाशी या धारेने आपला गंभीरपणे संबंध प्रस्थापित केला आहे. निंबाळकरांच्या कवितेचे वैशिष्ट्य हे, की तिने आंबेडकरी क्रांती-दर्शनाशी रक्ताचे नाते असलेल्या कवितेची धारा समृद्ध केली आहे. प्रसिद्धिच्या प्रेमाने, चलनी नाण्याच्या हव्यासाने, "जिधर दम उधर हम" या दुबळ्या प्रतिज्ञेने लिहिण्यापेक्षा निंबाळकर एका अविचल काव्यनिष्ठेने आणि सखोल सामाजिक जाणिवेने काव्यलेखन करीत आहेत. त्यांची कविता आता एका परिपक्व व एका समृद्ध मनाचा आविष्कार झालेली आहे. या कवितेत विद्रोह आहे. बेचैनी आहे. प्रतिकुलतेतून वाट काढण्याचे सामर्थ्य आहे. ही कविता युगाच्या नाडीचे ठोके या युगाच्या भाषेतूनच प्रकाशित करीत आहे.

महायुद्धातील कविता आंबेडकरी विद्रोही कवितेला पुन्हा एक सामर्थ्य प्रदान करीत आहे. अनुभवाशी आणि क्रांतीशी बांधलेली ही कविता दलित कवितेतील खूप निराळ्या शक्यतांची हमी घेऊन आली आहे.

**डॉ. यशवंत मनोहर**

**छपाई – मॅजेस्टिक प्रिंटिंग प्रेस, टिळक पुतळा, महाल, नागपूर–२**